दोन सराईत साखळीचोर गजाआड

स्टॉप अँड सर्च मोहिमेत इंदिरानगर पोलिसांची कारवाई

नाशिक । प्रतिनिधी

स्टाप ड सर्च कारवाई सुरु असताना इंदिरानगर पोलिसांनी दोन सोनसाखळी चोरट्यांना चेनस्नॅचिंग करतांना रंगेहाथ पकडले आहे. त्यांच्याकडून जबरी चोरीचे तीन गुन्हे उघडकीस आणत असून ३४ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने हस्तगत केले आहेत. दरम्यान, यात एका अल्पवयीनाचा सहभाग उघड झाला असून त्यांनी चोरीचे सोने काही सराफांना विकल्याचे समोर येते आहे. परवेज मनियार (२५) व अल्पवयीन संशयित(दोघे रा. शिवाजीनगर, सातपूर) अशी संशयित चेनस्नॅचरची नावे आहेत. दोघेही सराईत असून त्यांच्याकडून इतर गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे.

पोलिस आयुक्त संदीप कर्णिक यांनी शहरातील जबरी चोरी, घरफोडी, चोरी, वाहन चोरी असे गुन्हे रोखण्यासाठी स्टॉप ड सर्च मोहिम राबवण्याचे आदेश दिले आहेत. त्यात वाहन चालकांना अडवून त्यांची तपासणी केली जात असते. त्यानुसार, इंदिरानगरचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक अशोक शरमाळे यांच्या मार्गदर्शनाखाली बुधवारी (दि.३१) रात्री पाच अधिकारी व ३५ अंमलदारांचा फौजफाटा मोहिमेत होता. रथचक्र चौक येथे असताना पोलिसांना मिळालेल्या माहितीनुसार, दुचाकीवर दोघे संशयित संशयास्पदरित्या फिरत असल्याचे समजले. सहायक पोलिस निरीक्षक सुनील अंकोलकर, अंमलदार सागर कोळी, जयलाल राठोड यांच्या पथकाने संशयितांचा माग काढला. त्याचवेळी दोघे संशयित रथचक्र चौक परिसरात एका महिलेच्या गळ्यातील सोनसाखळी ओरबाडून पळू लागले. त्यावेळी मागावर असलेल्या पोलिसांनी दोघांना रंगेहाथ पकडले. दोघांनाही पोलिसांनी ताब्यात घेत चौकशी केली असता त्यांच्याकडे १८ व १६ ग्रॅम वजनाची सोन्याची पोती आढळून आली.

दोघांकडून चोरीचे दागिने खरेदी करणाऱ्या सराफ व्यावसायिक व कारागिरांचा शोध आता सुरु दोघांकडे तपास केला जात असून त्यांनी याआधी शहरातील विविध भागात अनेक चेनस्नॅचिंग केल्याचे समोर येत आहे. त्यामुळे चेन स्नॅचिंगनंतर हे सराईत सोन्याचे दागिने कोणाला विक्री करत होते याचा तपास पोलिस करीत आहेत. चेनस्नॅचिंगनंतर हे सराईत कोणत्या सराफाकडे दागिन्यांची विल्हेवाट लावत होते, त्यांचे साथीदार कुठे आहेत, पल्सर कुठून मिळविली, आतापर्यंत दोघांवर किती व कोणते, गुन्हे दाखल आहेत, याचा तपास केला जात आहे.

नंबरप्लेटला फासला चिखल

संशयितांनी इंदिरानगर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील चेतनानगर परिसरात रात्री ८ वाजेच्या सुमारास मंगल सुशील गरुड यांच्या गळ्यातील सोनसाखळी ओरबाडल्याची कबुली दिली. त्यामुळे दोघांविरोधात जबरी चोरीचे गुन्हे दाखल करण्यात आले आहे. दोघे संशयित दुचाकीच्या नंबर प्लेटला चिखल फासून बिनदिक्कत फिरत होते. जेणेकरून वाहन क्रमांक समजणार नाही. तसेच दोघांनी सर्वाधिक जबरी चोरी अंबडच्या हद्दीत केल्याचे समजते. दोघांकडून सोनसाखळी चोरीचे इतर गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

सुनावणीनंतर नाशिकलाच आणणार

गँगस्टर अबू सालेमसह कैदीपार्टी चोख बंदोबस्तात दिल्लीत

नाशिक । प्रतिनिधी

सर्वोच्च न्यायालयातील दाखल खटल्याच्या तारखेसह सुनावणीसाठी पहाटे नाशिकहून (दि. १) दिल्लीत नेलेल्या गँगस्टर अबू सालेमला येत्या तीन ऑगस्ट रोजी पुन्हा नाशकात आणले जाणार आहे. यानंतर त्याची रवानगी पूर्वीप्रमाणेच नाशिकरोड मध्यवर्ती कारागृहातील अंडासेलमध्ये केली जाणार असल्याची माहिती कारागृह प्रशासनाने दिली.

कुख्यात गँगस्टर आणि सन १९९३ च्या मुंबई बॉम्बस्फोटातील मुख्य आरोपी अबू सालेम अब्दुल कयुम अन्सारी याला नाशिक शहर पोलिसांच्या सशस्त्र पथकाने (दि.१) पहाटे चार वाजता नाशिकरोड रेल्वे स्थानकावरुन एक्स्प्रेसने दिल्ली येथे नेले. दरम्यान, आज शुक्रवारी(दि.२) सालेमला गंभीर खटल्याच्या सुनावणीसाठी सुप्रीम कोर्टात हजर केले जाईल. तर, या खटल्याची सुनावणी व सालेमच्या तारखेची न्यायालयीन कार्यवाही संपताच नाशिक आयुक्तालयाचे सशस्त्र सुरक्षा पथक परतीच्या प्रवासास लागण्याची शक्यता आहे. तर न्यायालयीत किंवा काही तांत्रिक अडचणी उद्भवल्यास पथक वरिष्ठांच्या सूचनेने निर्णय घेऊन नाशिक गाठणार आहे. यानंतर सालेमची रवानगी थेट सेंट्रल जेलच्या अंडासेलमध्ये केली जाणार आहे, असे समजते. सालेम हा विविध गंभीर गुन्ह्यातील मुख्य आरोपी व अंडरवर्ल्ड डॉन असल्याने त्याच्या जिवितास धोका असण्याची शक्यता गृहित धरुन आणि कायदा व सुव्यवस्थेस कोणतीही बाधा पोहोचू नये, यासाठी नाशिक पोलीस आयुक्तालयाने बंदोबस्ताचे कडेकोट नियोजन केले आहे. त्यानुसार ४४ पोलीस अधिकारी-अंमलदारांचा सशस्त्र बंदोबस्त पुरविण्यात आला आहे. तसेच वैद्यकीय पथक व स्थानिक पोलिसांचा स्वतंत्र बंदोबस्त देखिल तैनात आहे. अबू सालेम याला नवीन मुंबईतील तळोजा मध्यवर्ती कारागृहातून जुलै महिन्याच्या सुरुवातीला नाशिकरोड मध्यवर्ती कारागृहात हलविण्यात आले. तळोजातून नाशिकमध्ये हलविण्याविरुद्ध त्याने दाखल केलेली याचिका विशेष न्यायालयाने फेटाळली होती. त्यावर सालेमने उच्च न्यायालयात दावा दाखल केला होता. दुसऱ्या तुरुंगात हलविल्यास जीविताला धोका असल्याचे याचिकेत नमूद होते. मात्र, मुंबई उच्च न्यायालयात सुनावणीपूर्वी त्याला नाशिकमध्ये हलविण्यात आले आहे.

एक एसीपी, तीन पीआय

सालेमसोबत एक सहायक पोलिस आयुक्त, तीन पोलिस निरीक्षक, तीन सहायक निरीक्षक, दोन उपनिरीक्षक, पाच हवालदार आणि २७ अंमलदारांसह दोन कॅमेरामन आहेत. तर, जलद प्रतिसाद पथकातील दहा सशस्त्र अंमलदारांचा समावेश आहे. या पथकातील अधिकारी-कर्मचाऱ्यांना पिस्तुलासह अत्याधुनिक गन्स पुरविण्यात आल्या आहेत. तर तीन वैद्यकीय अधिकाऱ्यांचाही पथकात समावेश आहे. तसेच नाशिक ते दिल्ली व तेथून पुन्हा नाशिक कारागृहापर्यंत स्थानिक पोलिसांचाही अतिरिक्त बंदोबस्त जोडला जाणार आहे.

आठ अधिकारी, अंमलदार निवृत्त

नाशिक । प्रतिनिधी

शहर पोलीस दलातील ८ अधिकारी व अंमलदार बुधवारी (दि.३१) सेवानिवृत्त झाले. पोलीस आयुक्तालयात झालेल्या निरोप समारंभात सेवानिवृत्त पोलिसांचा सहकुटुंब सत्कार करण्यात आला. याप्रसंगी पोलीस उपआयुक्त प्रशांत बच्छाव, सहायक आयुक्त संदीप मिटके उपस्थित होते.

पोलीस दलात सहभागी झाल्यानंतर वयोमानानुसार ५८ वर्षे पूर्ण केलेल्या पोलिस अधिकारी व अंमलदारांची सेवानिवृत्ती झाली. या निरोप समारंभप्रसंगी सेवानिवृत्त झालेल्या पोलिसांनी मनोगत मांडून त्यांना आलेले अनुभव सांगितले. त्यानंतर त्यांचा सहकुटुंब सत्कार करण्यात आला. पोलिस निरीक्षक नंदन बगाडे, उपनिरीक्षक संभाजी निकुंभ, श्रेणी उपनिरीक्षक गजमल महाले, हसन पठाण, राजु जाधव, सहायक पोलीस उपनिरीक्षक वसंत पांडव, पोलीस हवालदार रंगनाथ सानप, छाया चौधरी हे सेवानिवृत्त झाले. वरिष्ठांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.

सेवानिवृत्त झालेल्या पोलीस अधिकार-अंमलदारांसोबत प्रशांत बच्छाव व संदीप मिटके.

सराईत घरफोड्या ताब्यात

१२ लाखांचे सोने हस्तगत

नाशिक । प्रतिनिधी

शहरातील उपनगर व इंदिरानगर येथे तीन घरफोड्या करणाऱ्या जळगावातील एका सराईत घरफोड्यास गुन्हेशाखेच्या युनिट दोनने अटक केली आहे. त्याच्याकडून तिन्ही गुन्ह्यांतील १२ लाख रुपयांचे २१ तोळे सोने हस्तगत केले आहे. चोरी केलेल्या पैसे व सोन्यातून हा चोरटा पिकअप वाहन घेण्याच्या तयारीत होता, अशी माहिती समोर आली आहे.

अजय राजू वाघेला(वय-२६, रा. गामणे मळा, मखमलाबाद शिवार, नाशिक. मुळ रा. रावेर रेल्वे स्टेशनजवळ, झोपडपटटी, ता. जि. जळगाव) असे सराईत संशयिताचे नाव आहे. त्याच्याकडून आणखीही गंभीर गुन्हे उघड होण्याची शक्यता आहे. शहर परिसरातील घरफोडी व चोरीच्या गुन्ह्यांना प्रतिबंध करण्याचे दृष्टीने पोलीस आयुक्त संदीप कर्णिक, उपायुक्त(गुन्हे) प्रशांत बच्छाव, सहायक पोलीस आयुक्त(गुन्हे)संदीप मिटके यांनी गुन्हेशाखेला आदेश दिले आहेत. त्या अनुषंगाने संशयित चोरट्यांचा शोध सुरु असतानाच(दि.३१) युनिट दोनचे हवालदार प्रकाश भालेराव व शंकर काळे यांना अजय वाघेला याची गोपनीय माहिती मिळाली. त्याने शहरात विविध घरफोडी केल्या असून त्याच्याकड खूप सोने आहे. हे सोने विकुन तो पिकअप घेणार असल्याची टीप मिळताच त्यांनी वरिष्ठ पोलीस निरीक्षक विद्यासागर श्रीमनवार यांना कळविली. त्यानंतर सहायक उपनिरीक्षक विलास गांगुर्डे, राजेंद्र घुमरे, सुनिल आहेर यांनी सिन्नरफाटा येथील महापालिका दवाखान्याजवळून वाघेला यास ताब्यात घेतले. तेव्हा त्याने उपनगर व इंदिरानगर पोलीस ठाण्यात दाखल घरफोडीच्या गुन्ह्यांची कबुली दिली. हवालदा प्रकाश भालेराव, शंकर काळे, गुलाब सोनार, संजय बोडके, नंदकुमार नांदुर्डीकर, प्रकाश महाजन, चंद्रकांत गवळी, विजय गांगुर्डे आदींनी कारवाई केली.

पोलीस अधिकारी हजर होईना

कामांचे नियोजन कोडमडले

नाशिक । प्रतिनिधी

जुलै महिन्याच्या सुरुवातीला राज्य पोलिस दलातील सहायक आयुक्तांसह निरीक्षकांच्या बदल्यांचे आदेश जारी होऊनही त्यापैकी अनेक अधिकारी बदलीच्या ठिकाणी अद्याप हजर झालेले नाहीत. त्यामुळे बदलीच्या ठिकाणी केव्हा हजर होणार, असा प्रश्न विचारत महासंचालक कार्यालयाने तातडीने संबंधित अधिकाऱ्यांना कार्यमुक्त करण्याचे आदेश पोलिस घटकांच्या प्रमुखांना दिले आहेत. नाशिक शहर पोलिस आयुक्तालयातही १ जुलै रोजी सात पोलीस निरीक्षकांची बदली करण्यात आली. मात्र, त्यापैकी केवळ दोन अधिकारी आतापर्यंत हजर झाले आहेत. राज्यातील ३७९ पोलीस निरीक्षकांच्या बदल्यांचे आदेश अपर पोलीस महासंचालक कार्यालयाने जारी केले होते. त्यानुसार पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे डॉ. अंचल मुदलग, ठाणे बॉम्ब शोधक व नाशिक पथकाचे जयंत शिरसाट, दहशतवादी विरोधी पथकाचे सचिन खैरनार, राज्य गुप्त वार्ता विभागाचे (एसआयडी) विश्वजीत जगताप, गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण विद्यालयाचे संजीव फुलपगारे, जातप्रमाणपत्र तपासणी समितीचे अतुल डहाके, नागपूरचे जग्वेंद्रसिंग राजपूत यांची नाशिक शहर आयुक्तालयात नियुक्ती केली आहे. त्यापैकी सचिन खैरनार व अतुल हडाके हे दोघेच हजर झाले आहेत. त्यापैकी खैरनार यांना आडगाव तर हडाके यांना म्हसरूळ पोलीस ठाण्याचे 'प्रभारी' करण्यात आले आहेत. उर्वरित निरीक्षक अद्याप हजर झाले नसल्याने आयुक्तालयाचे नियोजन रखडले आहे.

सुराडकर हजर

गृह विभागाने केलेल्या बदल्यांनुसार मीरा-भाईंदर-वसई-विरारमधून नाशिक आयुक्तालयात हजर झालेल्या पद्मजा बढे-चव्हाण यांना पंचवटी विभागाची जबाबदारी देण्यात आली आहे. तर, महाराष्ट्र पोलिस अकादमीतून नाशिक शहरात आलेल्या संगीता निकम यांच्याकडे प्रशासनाची जबाबदारी असेल. यासह पंचवटी विभागाचे 'एसीपी' नितीन जाधव यांना सरकारवाडा विभागात नेमले आहे. मात्र, सोलापूर प्रशिक्षण केंद्रातील उपअधीक्षक अनुराधा उदमले अद्याप नाशिकमध्ये हजर झालेल्या नाहीत. दरम्यान, मुंबई लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे अपर पोलिस अधीक्षक सुधाकर चंद्रभान सुराडकर हे हजर झाले असून ते आर्त शहर वाहतूक शाखेचे सहाय्यक आयुक्त असतील.

पंचवटीतील अट्टल चोर ताब्यात

भंगार विक्रेत्याने खरेदी केली चोरीची दुचाकी; युनिट एकची कारवाई

नाशिक । प्रतिनिधी

पंचवटीतील रामवाडी येथून दोघा अट्टल दुचाकी वाहन चोरट्यांना जेरबंद केल्यानंतर त्यांच्या दोघा साथीदारांना शहर गुन्हेशाखेच्या युनिट एकच्या पथकाने अटक केली आहे. विशेष म्हणजे चोरीचे वाहन खरेदी करणाऱ्या भंगार विक्रे त्यालाही पोलिसांनी ताब्यात घेत अटक केली आहे. त्यामुळे चोरांची टोळीच जेरबंद करण्यात यश आले आहे. कारवाईत चोरीच्या दोन दुचाकी वाहने जप्त करण्यात आली आहेत.

अभिजित श्रीराम राऊत (३६, रा. कुमावत गल्ली, रामवाडी), विजय नागराज रेड्डी (४३, रा. संजयनगर, वाघाडी), श्याम गिरीश ओढेकर (रा. डीजीपीनगर, अंबड), कुणाल दत्तात्रय सोनवणे (रा. पंचवटी) यांच्यासह भंगार विक्रेता राजेश गोपीनाथ साळी (रा. तिवंधा लेन, भद्रकाली) यांना पोलिसांनी अटक केली असून, त्यांच्या चौकशीतून अंबड, उपनगर, पंचवटी हद्दीतील तीन गुन्ह्यांची उकल झाली आहे. युनिट एकचे अंमलदार विशाल काठे यांना संशयित अभिजित व विजय हे रामवाडीतील गोदापार्क येथे चोरीची मोपेड घेऊन येणार असल्याची खबर मिळाली होती. त्यानुसार, वरिष्ठ पोलीस निरीक्षक मधुकर कड यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक निरीक्षक हेमंत तोडकर, रवींद्र बागुल, प्रदीप म्हसदे, प्रवीण वाघमारे, संदीप भांड, नाझीम खान, प्रशांत मरकड, शरद सोनवणे, जगेश्वर बोरसे यांच्या पथकाने सापळा रचून दोघा संशयितांना अटक केली. पोलीस चौकशीतून त्यांनी संशतिय शाम व कुणाल यांच्या मदतीने दुचाक्या चोरीची कबुली दिली. यात अंबड, पंचवटी व उपनगर हद्दीतील गुन्ह्याची उकल झाली.

वाहन केले स्क्रॅप

संशयितांकडून चोरीच्या क्टिव्हा (एमएच १५ बीवाय ९१५०), पॅशन प्रो (एमएच १५ सीए ९२३२) या एक लाखांच्या दोन वाहने जप्त केली. तर, प्लॅटिना दुचाकी (एमएच १५ सीए ३८७४) ही भंगार विक्रेता राजेश साळी यास विक्री केल्याचे सांगितले. त्यानुसार साळीला ताब्यात घेतले असता त्याने दुचाकी स्क्रॅप केल्याची कबुली दिली आहे.

राष्ट्रवादीप्रणित कामगार युनियन

नवीन नाशिक । नाशिक वेस्ट मॅनेजमेंट प्रा.लिमिटेड (कचरा डेपो) या कंपनीमार्फत कोणत्याही शासकीय सुविधा मिळत नसल्यामुळे आपल्या विविध समस्या सोडवण्याकरिता सर्व कामगारांनी राष्ट्रवादी काँगेस प्रणित मार्शल संघटित-असंघटित कामगार युनियनचे सदस्य होऊन या कंपनीमध्ये युनियनची स्थापना करण्यात आली.

यावेळी संघतेनेचे मार्गदर्शक आनंद सोनवणे यांच्या हस्ते कामगार युनियनच्या फलकाची फित कापून उद्घाटन करण्यात आले. यावेळी संघतेनेचे संस्थापक अध्यक्ष प्रशांत खरात, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी सरचिटणीस संजय खैरनार उपस्थित होते. यावेळी युनियनच्या शाखा अध्यक्षपदी प्रवीण विरेकर, उपाध्यक्षपदी ऋषिकेश बोराडे, सचिवपदी नितीन तेलुरे, खजिनदारपदी दीपक आंग्रे, सल्लागारपदी प्रवीण पवार, सहसल्लागारपदी आकाश बोराडे यांची तर सदस्य सोमनाथ बगड, गणेश ढगे, राकेश पगारे, निलेश करडईकर आदींची निवड करण्यात आली.

निधन वार्ता...

सोपान गायधनी

नाशिक । पळसे येथील सोपान किसन गायधनी (५७) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, भाऊ, भावजई असा परिवार आहे.

नर्मदाबाई पताडे

निळवंडी । दिंडोरी तालुक्यातील निळवंडी येथील नर्मदाबाई राजाराम पताडे (८५) यांचे अल्पशा आजाराने दुखद निधन झाले. त्यांच्या पश्चात ३ मुले, सुना, नातवंडे असा परिवार होता.त्या निळवंडी येथील शेतकरी विलास पताडे यांच्या आजी होत.

प्रमोद भार्गवे

खेडगाव । नाशिक येथील नामको बँकेतील सेवानिवृत्त कर्मचारी प्रमोद गोपाळकृष्ण भार्गवे (६३) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले . त्यांच्या पश्चात आई, पत्नी, मुलगा असा परिवार आहे.

क्लासिफाईड /सुपरमार्केट

पाहिजेत

श्री हरी ओम अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी लिमिटेड, नाशिक

पटेल आर्किड, दिंडोरी रोड, कच्छी लोहना मंगल कार्यालय जवळ, पंचवटी, नाशिक-४२२ ००३. फोन : ०२५३-२५११४८४

पाहिजेत

पतसंस्थेत खालील पदे त्वरित भरावयाची आहेत.

अकाऊंटंट/ लिपिक व शिपाई

वरील पदांचा अनुभव असल्यास प्राधान्य. तसेच इच्छुकांनी अर्जासह प्रत्यक्ष पतसंस्थेच्या कार्यालयास भेट द्यावी.

व्यवस्थापक
श्री हरी ओम अर्बन को-ऑप. क्रेडीट सोसायटी लिमिटेड, नाशिक, मो. ९९२१२६५५११.

श्री व्यंकटेश संस्थान ट्रस्ट नाशिकचे बालाजी मंदिर, ९१९, भांडी बाजार, कापड पेठ, नाशिक येथे मंदिराच्या व इतर कामासाठी तातडीने माणूस पाहिजे आहे. त्वरित संपर्क साधावा : 8275273399. (31/07)

निकी गारमेंट अँड स्पोर्ट दुकानासाठी अनुभवी सेल्समन पाहिजे समक्ष भेटा - पटेल आर्किट बिल्डिंग, दिंडोरी नाका, पंचवटी, नाशिक. भेट : वेळ सकाळी ९ ते १२ पर्यंत. (04/08-BK-3538)

खरेदी/विक्री

विकणे आहे

फक्त शेतजमीन विकत घेणाऱ्यांसाठी दिंडोरी व चांदवड तालुक्यात सर्व सोयीयुक्त जमीन घेणाऱ्यांकरिता विश्वसनीय संपर्क
9850945007
9049806111

भाड्याने देणे/घेणे

शरणपूर रोड येथे राजीव गांधी भवन समोर - 5000 स्क्वेअर फुट (कमर्शियल) जागा भाड्याने/विकणे आहे. संपर्क : 7020611500 / 8275055500. (30/07-CM-119)

दारुबंदीचा गुरुमंत्र

द ग्रेट साईंटिस्ट... (best doctor & gold medal awarded) डॉ.पालवे ॲडमिट करा... ।। नका करू... पेशंटला सांगा...।। नका सांगू... पेशंटला आणा... ।। नका आणू... * व्यसन पेशंटचे... विश्वास तुमचा... उपचार आमचे... Lifelong व्यसनापासून १०० टक्के मुक्ती... सर्व सुविधांनी परिपूर्ण : * व्यसनमुक्ती Special पॅक, मेडिसीन, इंजक्शन स्प्रे, ड्रॉप, ऑपरेशन, गोळी टाकणे, मंत्रोपचार... ॲडमिट सुविधा... * (विशेष) गरिबांसाठी फीमध्ये सवलत... तर संपर्क : 9552619752. डॉ.पालवे नशामुक्ती केंद्र, वरणगाव. (09/01/25) (CRINV-23-24JL/ CRG00555)

व्यसनमुक्ती

गॅरंटीने सोडवा. दारू + गुटखा + सिगारेट + बिडी + मावा + तंबाखू + बार + खैनी + भांग + गांजा + अफिम + जर्दा + ताडी + स्नेकबाईट + व्हाईट पावडर + व्हाईटनर + हिरॉईन + चरस + कोकेन + एमडी + एल.एस.डी. डॉट पेपर + झोपेची गोळी + इंजेक्शन... डॉ.पालवे नशामुक्ती केंद्र, वरणगाव. मो. 9552619752. WWW. drpalvenasha muktikendra.in, १००% रिझल्ट. (09/01/25) (CRINV-23-24JL CRG00554)

सर्व आजारांसाठी

जुनाट सर्दी, जुनाट दमा, जुनाट गुडघेदुखी, चालता, बसता, उठता न येणे, जुनाट संधीवात/चिकन गुनिया, जुनाट ॲलर्जी, जुनाट अर्धशिशी, जुनाट मूळव्याध, एचआयव्ही, भूक लागत नाही? वजन कमी? थकवा जाणवतोय?, Low CD4 Count? उपचार सर्वांसाठी, सर्व आजारांसाठी. भेटा- अहमदनगरचे सुप्रसिद्ध डॉक्टर पालवे, वरणगाव. मो.नं. 9552619752. (09/01/25) (CRINV-23-24JL/ CRG00556)

उपचार

भिती, ताणतणाव, नैराश्य, डिप्रेशन यापासून मुक्तता संमोहनाने उपचार. १००% गॅरन्टी एकदा अवश्य भेटा - मो.नं. 9767030989. (06/07-BK-3637)

शैक्षणिक

शासनमान्य डिप्लोमा कोर्स डिप्लोमा इन-नॅचरोपॅथी & योगिक सायन्स-२ वर्ष / योगा नॅचरोपॅथी-१ वर्ष. विठामाई योग निसर्गोपचार कॉलेज, गंगापूररोड नाशिक 9762069943. (31/07-BK-3305)

जाहिरात दर
- क्लासिफाईड डिस्प्ले रु. ६६/- प्रति स्क्वेअर सेमीसेंटर (कॉलम साईज ३.३ सें.मी.)
- ४० शब्दापर्यंतच्या छोट्या जाहिराती रु. १५/- प्रतिशब्द
- ३+१ फ्री
- क्लासिफाईड डिस्प्ले ३+१ फ्री
- कमीत कमी शब्दमर्यादा १० शब्द
- हायलाईट बॉक्स रु. १५०/- मात्र (प्रति दिवस)
- पोस्ट बॉक्स रु. ३००/- मात्र.

नावात बदल

My old name SHARMIN AHEMAD ANSARI has been changed to my new name SHARMIN AHEMAD ALI ANSARI as per Aadhar No. 9190 0925 3069. (CM-126)

My old name SHAIKH SHARMIN MO. YUSUF has been changed to my new name SHAIKH SHARMIN MOHAMMAD YUSUF as per Aadhar No. 9190 0925 3069. (CM-126)

I changed My Name From KHALIL AHMED ASHRAFI IMAJUDDIN SHAIKH To New Name KHALIL AHMAD IMAJODDIN SHAIKH As Aadhar No. 9853 6650 5472. (BK-3633)

माझे जुने नाव हुल्लाशी मिश्रीलाल बागमार असे होते. आता माझे नवीन नाव मधुबाला रिखबचंद संचेती असे झाले आहे. आधार कार्ड नं. 3807 0620 1136. (BK-3634)

माझे जुने नाव रश्मी विवेकानंद निंबाळकर असे होते. आता माझे नवीन नाव रश्मी अमर इटगी असे झाले आहे. आधार नं. 3024 7023 3207. (BK-3635)

I Navid Yunus Pathan declare That, My minor son's old name was Almir that has been changed now as Almir Navid Pathan as per Aadhar No. 8779 3836 5150. (BK-3636)

माझे जुने नाव सुधीरभाई रतिलाल शेठ असून आता माझे नवीन नाव सुधीर रतिलाल शेठ असे आहे संदर्भ आधार कार्ड नंबर 4190 3131 2412. (BK-3638)

जाहिरात दर
- क्लासिफाईड डिस्प्ले रु. ६६/- प्रति स्क्वेअर सेमीसेंटर (कॉलम साईज ३.३ सें.मी.)
- ४० शब्दापर्यंतच्या छोट्या जाहिराती रु. १४/- प्रतिशब्द
- ३+१ फ्री
- क्लासिफाईड डिस्प्ले ३+१ फ्री
- कमीत कमी शब्दमर्यादा १० शब्द
- हायलाईट बॉक्स रु. १५०/- मात्र (प्रति दिवस)
- पोस्ट बॉक्स रु. ३००/- मात्र.

वाचकांना विनम्र सूचना

'देशदूत' वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातीतील मजकुराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात, त्याची देशदूत वृत्तपत्र समूह कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पूर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल देशदूत वृत्तपत्र समूहाचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाहीत, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

टीप : बाळाचा फोटो प्रकाशित करण्यासाठी रु. १००/- शुल्क आकारले जाईल.

या सदरात केवळ १ ते ५ वर्षादरम्यानच्या बाळाचेच फोटो प्रकाशित केले जातील.

- **जाहिरात विभाग,** दै.देशदूत, एम.जी.रोड, नाशिक. ०२५३- २५७५७१६
- **नाशिकरोड :** प्रतिक आर्केड, शॉप नं. २५, देना बँकेच्या वरती, बिटको पॉईंट. ०२५३-२४६२७५६
- **निफाड :** मार्केट कमेटी, व्यापारी संकुल, बसस्टॅण्डशेजारी, गोदावरी प्रिंटींग प्रेसच्या वरती. ०२५५०-२४११००
- **दिंडोरी :** दिंडोरी कृ.उ.बा. समिती कॉम्प्लेक्स, पंचायत समिती गेटसमोर. ०२५५७-२२२८८८
- **मालेगांव :** पांजरपोळ शॉपिंग सेंटर, छ.शिवाजी पुतळयाजवळ. ०२५५४-२४३४६२२
- **सिन्नर :** दुसरा मजला, मोतीकमल टॉवर, बसस्थानकासमोर. ०२५५१-२२२१५१. या कार्यालयांमध्ये बाळाचे फोटो स्विकारले जातील.